Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3 (B)| March - 2026

Original Article

# भारतातील सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाचे मार्ग: एक चिकित्सक अभ्यास.

**डॉ.विशाल मुरलीधर कदम**
सहयोगी प्राध्यापक, भूगोल विभाग, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग
Email: kadamv000@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180336
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(B)
Pp. 145-147
March - 2026
**Submitted:** 03 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 28 Mar. 2026
**Published:** 31 Mar 2026

**गोषवारा :**

*आर्थिक प्रगतीसोबतच समाजातील तळागाळातील घटकांचा सर्वसमावेशक विकास आणि पर्यावरणाचे शाश्वत रक्षण यांचा मेळ घालणे हे आजच्या काळातील मोठे आव्हान आहे. या सदर संशोधनात सरकारी धोरणे, तंत्रज्ञानाची भूमिका आणि सामाजिक बदलांच्या आवश्यकतेवर प्रकाश टाकण्यात आला आहे.* निसर्ग व मानव यांचा खुपच जवळचा संबंध आहे. निसर्ग व मानव यांच्यातील संतुलीत आंतरसंबंधामुळेच पर्यावरणाचे संतुलन अबाधीत आहे. मानवाच्या सर्वांगीण विकासात त्यांच्या सभोवतालचे पर्यावरण महत्वपूर्ण भूमिका बजावित असतो, मानवाचा आहार, पोषाख, संस्कृती ही सभोवतालच्या पर्यावरणाने समृद्ध होत असतो. परंतु सध्या मानवाने ज्ञान विज्ञान, तंत्रज्ञानाच्या बळावर, आपला अतिरेकी विकास घडवून आणण्यासाठी निसर्गाची मोडतोड करण्यास मोठा हातभार लावत आहे. पर्यावरणाचे नैसर्गिक संतुलन ढासळत आहे. संपूर्ण जीवसृष्टीचे अस्तीत्व धोक्यात आले आहे. त्यामुळेच पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धण हाच खरा *सर्वसमावेशक* शाश्वत विकास होय.

***मुख्य शब्द*** शाश्वत विकास (Sustainable *Development*), ***सर्वसमावेशक शाश्वत विकासाचे मार्ग*** *)Pathways to inclusive and sustainable development).*

## प्रस्तावना : Introduction

२१ व्या शतकात केवळ 'जीडीपी' (GDP) वाढवणे म्हणजे विकास नव्हे. खऱ्या अर्थाने विकास तेव्हाच होतो जेव्हा तो सर्वसमावेशक असतो म्हणजेच त्यात गरीब, स्त्रिया, ग्रामीण भाग आणि अल्पसंख्याकांचा सहभाग असतो आणि शाश्वत असतो म्हणजेच तो भविष्यातील पिढ्यांच्या गरजांशी तडजोड न करता केला जातो. संयुक्त राष्ट्रांनी ठरवून दिलेल्या १७ शाश्वत विकास ध्येयांच्या (SDGs) दिशेने भारताची वाटचाल सुरू आहे. नैसर्गिक संसाधन व मानव विकास यांचा खुपच जवळचा संबंध आहे. मानव व पर्यावरण यांच्यातील योग्य संतुलीत क्रिया प्रतिक्रियामुळेच पर्यावरणाचे संतुलन शाश्वत राहते, चिरंजीवी राहते परंतु आज मानव अतिरेकी विकासासाठी पर्यावरणाचे शोषण करित आहे. नैसर्गिक संसाधनाचा अतिरेकी वापर करत आहे त्यात वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण, वाढते नागरीकरन यामुळे पर्यावरण प्रदुषण, निसर्गाच्या ऱ्हास होण्यास प्रारंभ झाला आहे. असेच अविवेकी आचरण होत राहिल्यास आज आणि पुढील पिढीला अनेक भयानक समस्यांना सामोरे जावे लागेल त्यामुळे चालु काळातील विकासा बरोबरच भविष्यकालीन विकासांचा विचार करण्याची आता वेळ आली आहे.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*विशाल मुरलीधर कदम, सहयोगी प्राध्यापक, भूगोल विभाग, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग*

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21158363
OPEN ACCESS

***How to cite this article:***
*कदम, . विशाल . मुरलीधर . (2026). भारतातील सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाचे मार्ग: एक चिकित्सक अभ्यास. Journal of research and development, 18(3(B)), 145–147.*
*https://doi.org/10.5281/zenodo.21158363*

भविष्यकालीन विकासाचा विचार म्हणजेच सर्वसमावेशक शाश्वत विकास होय.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाचा अर्थ समजून घेणे
2. सर्वसमावेशक विकासातील प्रमुख अडथळे ओळखणे, अभ्यासने
3. आर्थिक वाढ आणि पर्यावरण रक्षण यांचा समतोल साधण्याचे उपाय समजूण घेणे
4. सर्वसमावेशक शाश्वत विकासाचे मार्ग अभ्यासने.

**शाश्वत विकासाचा अर्थ :**

ब्रन्डलँड आयोगाच्या मते, "शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो भविष्यकालीन पिढयांची स्वतःच्या गरजा भागविण्याची क्षमता धोक्यात न आणता वर्तमानातील गरजा भागवू शकतो."

वरील व्याख्येवरूण आपणास लक्षात येते की शाश्वत विकास हि सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण विकासाशी संबंधीत संकल्पना आहे. "जगा आणि जगू द्या" हे त्याचे उच्चतम ध्येय आहे.

**सर्वसमावेशक विकासाचे मार्ग: (Pathways to Inclusive Development)**

विकास समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचण्यासाठी खालील मार्ग महत्त्वाचे आहेत

1. डिजिटल क्रांती: Digital India मोहिमेमुळे बँकिंग आणि सरकारी योजना थेट लोकांच्या खात्यात (DBT) पोहचत आहेत.
2. शिक्षण आणि कौशल्य विकास: सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण आणि तरुणांना हाताला काम देण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम आवश्यक आहेत.
3. महिला सक्षमीकरण: आर्थिक निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवणे हा सर्वसमावेशकतेचा पाया आहे.
4. लिंग विषयक समानता: मानवी पर्यावरणाच्या शाश्वततेसाठी विकास प्रक्रियेतील लिंगभेद दूर होणे गरजेचे आहे. आरोग्य, पोषण व शिक्षणातील तफावती मुळे महिलांची विकासातील भूमिका मर्यादित राहते. त्यामुळेच लिंगविषयक समानता हा शाश्वत विकासासाठी महत्त्वाचा आहे.

**शाश्वत विकासाचे मार्ग (Pathways to Sustainable Development)**

पर्यावरण टिकवून ठेवण्यासाठी खालील पावले उचलणे गरजेचे आहे

नूतनीकरणक्षम ऊर्जा (Renewable Energy): अपारंपरिक उर्जा निर्मितीवर भर दिला पाहिजे. उदा. सौर उर्जा, पवन उर्जा, जल उर्जा. सौर आणि पवन ऊर्जेचा वापर वाढवणे. भारताचे २०२६ पर्यंतचे लक्ष हरित ऊर्जा निर्मितीवर केंद्रित आहे.

हरित शेती (Green Agriculture): रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे.

कचरा व्यवस्थापन: 'Circular Economy'

म्हणजेच कचऱ्यातून पुनर्निर्मिती करण्याच्या मॉडेलचा अवलंब करणे.

लोकसंख्या नियंत्रण: जेवढी लोकसंख्या जास्त तेवढी पर्यावरणाची अवनती जास्त अशा स्थितीत चिरंतन विकास साध्य करता येत नाही शाश्वत विकासासाठी लोकसंख्येवर नियंत्रण असणे आवश्यक ठरते.

नैसर्गिक संसाधनाचे जतन: शाश्वत विकासासाठी जमीन, हवा, पाणी, जंगल, विविध वनस्पती, विविध खनिज संपदा इत्यादीचे नैसर्गिक संतुलन अबाधित असले पाहिजे. पाण्याचा योग्य वापर, भरपूर वृक्ष लागवड, सेंद्रीय शेती, लोकसंख्येवर आळा आणून नैसर्गिक संसाधनाचे जतन शाश्वत विकासासाठी अतिशय महत्त्वाचे आहे.

सकल देशी उत्पादन : देशातील उत्पादनाचा दर जेवढा अधिक असेल तेवढा अधिक रोजगार निर्माण होतो. देशातील दारिद्रय कमी होण्यास मदत होते. लोकांच्या कल्याणात वाढ होते, देशात स्थिरता येवून पर्यावरणाच समतोल साधला जातो.

वाहतूक व दळणवळणाची सधनता: वाहतूक व दळणवळणाच्या क्षेत्रातील अद्यावत सुविधा शाश्वत विकासासाठी महत्त्वाचे निर्देशक ठरते.

मानवी संसाधनाचा विकास: आरोग्य, शिक्षण, आहार आणि आर्थिक स्थिती इत्यादीचा विचार करून मानवी संसाधन विकास निर्देशांक तयार केला जातो हा निर्देशांक 0.8 पेक्षा अधिक असेल तर मानवी विकास अधिक आहे असे समजण्यात येते. तर 0.5 पेक्षा निर्देशांक कमी असेल तर मानव विकास कमी समजण्यात येतो. मानव विकास जेवढा अधिक असेल तेवढा देशाचा शाश्वत विकास अधिक होतो.

UNDP ने डिसेंबर 2020 मध्ये मानव विकास अहवाल - 2020 जाहीर केला 189 देशांच्या या यादीमध्ये भारताचा क्रमांक 131 वा आहे. भारताचा मानव विकास निर्देशांक 0.645 इतका आहे भारतास मध्यम मानव विकास देशांच्या गटात टाकण्यात आले आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3 (B)| March - 2026

वरील विकास मार्ग बरोबरच प्रदुषणावर नियंत्रण आणले पाहिजे. स्वच्छ, निर्मळ पर्यावरण शाश्वत विकासाचे महत्त्वाचे ध्येय आहे. जगात प्रचंड सामाजिक, जैविक सांस्कृतिक विविधता आहे. त्याचे स्विकार करून नैसर्गिक संसाधनाचा विकास झाला पाहिजे. आरोग्य विकास, महिलांचा विकास, शाश्वत विकासात लोकसहभाग, शाश्वत कृषी विकास ही सर्व सर्वसमावेशक आणि शाश्वत विकास मार्ग आहेत.

**प्रमुख आव्हाने (Major Challenges)**

संशोधनानुसार, मार्गात खालील अडथळे आहेत:

1. वाढती लोकसंख्या आणि मर्यादित नैसर्गिक संसाधने.
2. हवामान बदलामुळे (Climate Change) शेतीवर होणारा परिणाम.
3. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील वाढती आर्थिक दरी

**समारोप :**

सर्वसमावेशक आणि शाश्वत विकास हा केवळ सरकारचा विषय नसून ती एक लोकचळवळ झाली पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शकता आणणे आणि स्थानिक पातळीवर संसाधनांचे नियोजन करणे हेच प्रगतीचे खरे मार्ग आहेत. जर आपण आज नैसर्गिक संसाधनांचा वापर जपून केला आणि सामाजिक समता पाळली, तरच २०३० पर्यंतची शाश्वत ध्येये गाठणे शक्य होईल.

एडवर्ड बार्बियर याने शाश्वत विकास समजावून सांगण्यासाठी एका व्हेन आकृतीचा उपयोग केला आहे. या व्हेन आकृतीत तीन वर्तुळे अनुक्रमे सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय विकासाची आहेत. सामाजिक व आर्थिक विकासासाठी समान न्यायपूर्ण विकास झाला पाहिजे. सामाजिक विकास पर्यावरण विकासाला सुसह्य असला पाहिजे. तसेच आर्थिक विकास तेंव्हा होऊ शकतो जेव्हा तो पर्यावरणाला पुनर्निर्मितीक्षम व वर्धनक्षम बनवेल. म्हणूनच सामाजिक आर्थिक व पर्यावरणीय विकास करण्यासाठी विकास न्यायपूर्ण, सुसह्य, व वर्धनक्षम असला पाहिजे.

सर्वसमावेशक आणि शाश्वत विकास साध्य करण्यासाठी विविध उपाययोजना प्रत्यक्ष राबविणे आवश्यक आहे. शालेय अभ्यासक्रमात 'शाश्वत जीवनशैली' या विषयाचा समावेश करावा. ग्रामीण भागात लघुउद्योगांना (MSMEs) अधिक प्रोत्साहन द्यावे लागेल. कार्बन उत्सर्जन कमी करणाऱ्या उद्योगांना कर सवलत द्यावी लागतील.

**संदर्भ :**

1. आर्थिक व सामाजिक विकास - श्री. किरण जी. दिसले
2. पर्यावरण पारिस्थितीकी - डॉ. तुषार घोरपडे
a. 3. पर्यावरण अभ्यास - डॉ. सुरेश फुले
2. भारतीय अर्थव्यवस्था - रंजन कोळंबे
3. पर्यावरण शिक्षण - डॉ. के. म. भांडारकर
4. विकास आणि पर्यावरणीय अर्थशास्त्र - डॉ. बी.डी. इंगळे
5. नीति आयोग वार्षिक अहवाल (२०२५-२६).
6. संयुक्त राष्ट्रे (UN) शाश्वत विकास ध्येय अहवाल.
7. NITI Aayog SDG India Index